स्थापना - १८८७

नगर परिषद कार्यालय, वाशिम.

E-mail-mcwashim@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२००९
फॅक्स क्रमांक ०७२५२-२३१०४१

जा.क्र. :नपवा /नियो/कार्या-१४/बा.परवानगी/४७० / २०१५
नगर परिषद कार्यालय,वाशिम जि.वाशिम .
दिनांक ४/१२/२०१५

परिशिष्ट - ड
(उपविधी नियम न-१० -१)
बांधकाम परवाना

प्रेषक

नियोजन प्राधिकरण
वाशिम नगर परिषद,वाशिम

प्रती,

श्री टेक्टॉन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा.ली.
तर्फे डायरेक्टर श्री रजनीश जैन
रा.लाखाळा ,वाशिम

संदर्भ :- १) आपला दि. १६.०५.२०१५ रोजीचा अर्ज
२) या कार्यालयाचे पत्र क्र. नपवा/नियो/कार्या-१४/बा.पर/६३९/१५,दि.२९.०५.२०१५.

आपणांस कळविण्यात येते की, आपले बांधकाम प्रकरण दि. **16.05.2015** च्या अर्जातील संदर्भ क्र. १ नुसार मौजा गोंदेश्वर येथील **S.NO 59/1 Plot NO. 01** वार्ड न. **10** वाशिम शहरातील महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये, लाल रंगाने समास अंतारा मध्ये दुरुस्त्या प्रमाणे बांधकाम नकाशातील विंग ए ,विंग बी व विंग सि चे खालील अटीस अनुसरुन बांधकाम परवाना देण्यात येत आहे .

अटी : -

१) बांधकाम करतांना रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी साहित्य रस्त्यावर असल्यास ग्रांउड रेन्ट भरावे लागेल .
२) नकाशात दुरुस्त केल्याप्रमाणे बांधकाम करावे लागेल.
३) पाण्याचा निच-या करिता आपणांस स्वखर्चाने पक्की नाली बांधुन व्यवस्था करणे बंधनकारक असेल .
४) आपल्या बांधकामामुळे कोणत्याही हक्कास किंवा वहिवाटिस बाधा उत्पन्न झाल्यास ही परवानगी ताबडतोब रद करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे .
५) बांधकामामुळे न.प. च्या रस्त्याचे नालीचे नुकसान झाल्यास त्याची आपणा कडुन भरपाई केल्या जाईल.
६) बांधकामाचे परिक्षेत्रात दोन झाडे वृक्ष कर अधिनियमा नुसार लावुन त्याची जोपासना हे आपलेवर कायदेशीर बंधन राहिल .
७) बांधकाम चालु केल्याचा व पुर्ण झाल्याचा वेगवेगळे रिपोर्ट देणे बंधनकारक राहील .
८) बांधकामात कोणत्याही प्रकरची फेरफार मुख्य अधिका-याची परवानगी शिवाय करता कामा नये .
९) बांधकाम परवानगी केवळ निवासी /व्यवसायीक / सार्वजनिक/ निमसार्वजनिक इमारतीचे भूमिगत तळ मजला/ तळ मजला/ पहिला मजला/ तसेच संदनिकेचे तळ मजला ते ६ व्या मजल्या करिता आहे.
१०) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर या कार्यालया कडुन वापर प्रमाणपत्र प्राप्त करावे .
११) जागेच्या मालकी हक्का बाबत अथवा जागेच्या हदी बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.
१२) प्रस्तावित बांधकाम हे भुकंप प्रतिरोधक असल्याची खात्री करुन घ्यावी.व भुकंपा पासुन हाणी होवू नये म्हणुन इमारतीच्या स्थेर्याबाबत इमारतीचे RCC डिझाइन वास्तु विशारद यांचे कडुन करुन घ्यावे.
१३) छतावरिल व भुखंडावर पडलेले पाणी साठविण्याची रेन वाटर हार्वेस्टींग बधनंकारक राहील.
१४) बांधकाम मंजुरी आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन सदर मंजुरी एका वर्षा पर्यंत वैध राहिल.
१५) इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मुख्याधिकारी यांचा वापर प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय इमारत वापर सुरु करण्यात येवू नये .

१६) नियोजित शौचकुपाची सोकपीठ /सेप्टीक टाकी जवळच्या कोणत्याही विहिरीपासुन अथवा पिण्याच्य पाण्याच्या उदभवापासुन ९.१५ मी. (३० फुट) अंतराच्या बाहेर असणे बंधनकारक आहे .

१७) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

१८) सेप्टीक टाकी व सोकपीठ स्वतंत्र (किमान १००० लि) असणे आवश्यक आहे .

१९) नकाशात दर्शविलेल्या दुरुस्त्यांचे व वरील अटी शर्तीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे .सदर अटींचे व सूचनांचे कोणतेही उल्लंघन केल्यास भोगाधिकार प्रमाणपत्र रोखून ठेवले जाईल.

२०) प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये पावसाळी पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग/गटारे असतील तर ते अबाधित ठेवावेत किंवा त्यांची योग्य ती व्यवस्था करावी . कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचे मार्ग,पारंपारीक पायवाटा /मार्ग बंद करु नयेत .

२१) रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र नगर परिषदेकडे नोंदणीकृत बक्षीसपत्राद्वारे विनामुल्य हस्तांतरीत करुन देणे बंननकारक आहे .

२२) सांडपाण्याची पाईपलाईन न.प. च्या प्रस्तावित भूयारी गटार योजनेच्या पाईपलाईनला जोडणे बाबतची तजविज करणे बंधनकारक असून याबाबत न.प. कडून वेळोवेळी केल्या जाणा-या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे .

२३) सांडपाणी व्यवस्थापनासाठी फिल्टरेशन पध्दतीने पुनर्वापर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र युनिट तयार करुन बाथरुम व किचनमधील पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे .

२४) महाराष्ट्र विघटनशील व अविघनशील कचरा(नियंत्रण) अध्यादेश , २००६ नुसार टाकावू पदार्थ गोळा करण्यासाठी /आपल्या जागेत साठवून ठेवण्यासाठी दोन स्वतंत्र कचरा कुंड्या (हिरव्या व पांढ-या) ठेऊन ओला व सुका कचरा ठेवण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल .

२५) प्लास्टीक वापराबाबत शासन व नगर परिषद यांचे कडून वेळोवेळी होणा-या आदेशाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहिल .

२६) इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेची नळजोडणी घेणे बंधनकारक आहे . अन्यथा भोगाधिकार प्रमाणपत्र देण्यात येणार नाही .

२७) सदर इमारती मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००९ नूसार आवश्यक ती आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी . सदर उपाययोजना करण्याकरिता मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांनी नियुक्त केलेल्या अभिकरणा मार्फत करण्यात यावी . सदर अभिकरण यांची यादी ही शासनाच्या www.mahafireservices. org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

4/12/15

मुख्य अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
वाशिम नगर परिषद,वाशिम

प्रत माहितीसाठी सादर

१)मा. जिल्हाधिकारी ,वाशिम यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

२)कर विभाग ,न.प.वाशिम ,यांना माहिती करिता रवाना .

-रवा/-
मुख्य अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
वाशिम नगर परिषद,वाशिम

MUNICIPAL COUNCIL SEAL OF WASHIM